लोकसत्ता

Sat, 17 Mar-18; Loksatta - Mumbai; Size : 294 sq.cm.; Circulation:221377;
Page : 12

# म्युच्युअल फंडात गुंतवणूक : सुरुवात कशी?

म्युच्युअल फंडाविषयीच्या वाचकांकडून आलेल्या प्रश्नांना आपण या स्तंभातून विचारात घेणार आहोत. अनेकांकडून खाली काही मूलभूत प्रश्न अनेकवार विचारले गेले आहेत.

### १. म्युच्युअल फंड म्हणजे काय?

म्युच्युअल फंड मोठ्या संख्येने गुंतवणूकदारांचे पैसे एकत्र जमा करतात आणि पैसे एकत्र करून त्यांचे व्यवस्थापन करतात. गुंतवणूकदाराने कोणत्या समभाग किंवा रोखे (बाँड) किंवा कमोडिटीत गुंतवणूक करायची याची चिंता करण्यापेक्षा व्यावसायिक निधी व्यवस्थापक त्यांच्या वतीने हे काम करतात. ज्या व्यक्तिगत गुंतवणूकदारांपाशी गुंतवणुकीचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी फारसा वेळ नसतो, त्यांच्यासाठी अतिशय सुलभपणे वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकीचा फायदा करून घेण्यासाठी म्युच्युअल फंड हा उत्तम पर्याय आहे आणि अगदी छोट्या रकमेची गुंतवणूक करून म्हणजे पाचशे रुपयांपासूनदेखील गुंतवणूक करणे शक्य असते.

### २ म्युच्युअल फंडात गुंतवणूक कशी करावी?

**वितरक (डिस्ट्रिब्युटर) :** आपण गुंतवणूक सल्लागाराच्या मदतीने/त्याच्या मार्फत म्हणजे 'ॲम्फी'कडे नोंदणी केलेल्या म्युच्युअल फंड वितरकामार्फत गुंतवणूक करू शकतो.

**थेट (डायरेक्ट) :** म्युच्युअल फंडाच्या शाखेच्या कार्यालयात किंवा नियोजित गुंतवणूकदार सेवा केन्द्रात (आयएससी) किंवा संबंधित म्युच्युअल फंडाच्या रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट्स यांच्या कार्यालयात पूर्ण भरलेला अर्ज आणि धनादेश जमा करून आपण गुंतवणूक करू शकतो.

**ऑनलाइन :** संबंधित म्युच्युअल फंडाच्या वेबसाइटवरून आपण ऑनलाइन गुंतवणूकही करू शकतो.

**मोबाइल ॲप :** वेगवेगळ्या म्युच्युअल फंडांनी उपलब्ध करून दिलेल्या मोबाइल ॲप्सच्या साहाय्याने देखील गुंतवणूकदार गुंतवणूक करू शकतो.

**एमएफ युटिलिटी (एमएफयू):** हा म्युच्युअल फंडाचा एक नावीन्यपूर्ण उपक्रम आहे ज्यात म्युच्युअल फंडाच्या गुंतवणूकदाराला त्याच्या व्यवहाराबद्दल सुविधा उपलब्ध करून दिली जाते. एमएफयूद्वारे गुंतवणूकदाराला कॉमन अकाऊंट नंबर (कॅन) दिला जातो. ज्यामुळे त्याला एमएफयूमध्ये सहभागी होणाऱ्या विविध म्युच्युअल फंडांच्या अनेक योजनांमध्ये एकाच व्यवहाराद्वारे आणि एकत्रितपणे पैसे भरून व्यवहार करता येतो. एमएफयूद्वारे गुंतवणूकदाराला त्याच्या प्रत्येक फंड घराण्याच्या गुंतवणुकीचे आणि त्याच्या व्यवहारांचा एकत्रित आढावा घेता येतो.

### ३ नक्त मालमत्ता मूल्य (नेट ॲसेट व्हॅल्यू - एनएव्ही) म्हणजे काय?

म्युच्युअल फंडाच्या एखाद्या



वित्त मानस

ठरावीक योजनेच्या कामगिरीला नक्त मालमत्ता मूल्य (नेट ॲसेट व्हॅल्यू - एनएव्ही) म्हणतात. गुंतवणूकदारांकडून गोळा केलेल्या पैशाची म्युच्युअल फंड बाजारपेठेत गुंतवणूक करतात. साध्या शब्दात, एनएव्ही म्हणजे योजनेत धारण केलेल्या रोख्यांचे बाजारपेठेतील मूल्य. रोख्यांच्या मूल्यात रोज बदल होत असल्यामुळे योजनेच्या एनएव्हीमध्येही रोज बदल होतो. 'एसआयडी'मधील फॉर्म्युलापर्यंत एनएव्हीचा हिशेब करण्यासंबंधी तपशील उपलब्ध आहे. प्रति युनिट एनएव्ही म्हणजे एखाद्या ठरावीक दिवशी योजनेच्या रोख्यांचे बाजारपेठेतील मूल्य भागिले योजनेतील एकूण युनिट्सची संख्या. सर्व म्युच्युअल फंड योजनांच्या प्रति युनिट एनएव्हीची माहिती 'ॲम्फी' वेबसाइटवर आणि म्युच्युअल फंडांच्या वेबसाइटवर त्या दिवशी रात्री ९ वाजेपर्यंत बदलली जाते. 'ॲम्फी' वेबसाइट लिंक खालीलप्रमाणे :
https://www.amfiindia.com/nav-history-download

### ४ म्युच्युअल फंड योजनेचा अर्ज आणि बंधनकारक माहिती कशी भरावी?

गुंतवणुकीला सुरुवात करण्यापूर्वी काही औपचारिकता पूर्ण करणे गरजेचे असते. गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूकदार आणि सह-गुंतवणूकदाराला 'केवायसी' अटींची पूर्तता करावी लागते. गुंतवणूकदार आणि सह-गुंतवणूकदाराचे पॅन आणि आधारकार्ड यांच्या स्वप्रमाणित छायाप्रती केवायसी अर्जासोबत लावणे गरजेचे असते. पहिल्यांदा गुंतवणूक करणाऱ्याने आपल्या म्युच्युअल फंड अर्जासोबत पूर्ण भरलेला केवायसी अर्ज म्युच्युअल फंड विक्रेता, म्युच्युअल फंडाचे कार्यालय किंवा फंडाचे रजिस्ट्रार यांच्याकडे जमा करावा. गुंतवणूकदाराने त्याचे नाव, पत्ता, बँकेचा तपशील, नामांकन, ई-मेल आयडी, मोबाइल क्रमांक, योजनेचा तपशील आणि अर्जात नमूद केलेली इतर संबंधित माहिती भरावी. काही ॲसेट मॅनेजमेंट कंपन्यांच्या वेबसाइटवर अर्जाचा नमुनादेखील उपलब्ध असतो.

**भालचंद्र जोशी**

(लेखक गेली २७ वर्षे बँकिंग आणि आर्थिक सेवा क्षेत्रात कार्यरत असून, सध्या रिलायन्स म्युच्युअल फंडात गुंतवणूकदार सेवा आणि ऑपरेशन्स विभागाचे प्रमुख आहेत.)

म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीला बाजारपेठेची जोखीमा लागू आहेत; योजनेशी संबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचून घ्यावेत.

आपले प्रश्न - **arthmanas@expressindia.com** या ईमेलवर शक्यतो युनिकोडमध्ये मराठीत टाइप करून पाठवा.